70/2020

J 2019-20

# Vol. 68 No. 11 (2020): One Day Conference on "Arts, Sculpture Marathwada"

**One Day Interdisciplinary National Conference on**

**"Arts, Sculpture and Architecture in Marathwada"**

**Held on 01st February 2020**

**Organized by:**

**Department of History,**

**Pratishthan Mahavidyalaya,** Paithan

(NAAC Re-accredited with 'B' Grade)

Tq. Paithan, Dist. Aurangabad -431107

Scanned by TapScanner

**OUR HERITAGE**
*ISSN (Online) : 0474-9030 Vol-67, Special Issue-11*
Impact Factor (2020) - 6.8

| | | | |
|---|---|---|---|
| 158 | औरंगाबादमधील नाट्यचळवळीची सद्यस्थिती | डॉ.गणेश मदनराव शिंदे | |
| 159 | "भारतीय समाज शिक्षण आणि संस्कृतीचा समाजशास्त्रीय अभ्यास" | प्रा. डॉ. गायके सदिपान | |
| 160 | **"उस्मानाबाद शहरातील निजामकालीन वाड्यांची सामाजिक ऐक्यामधील भूमिका : संक्षिप्त आढावा"** | **प्रा.डॉ.जयश्री रमेश कुलकर्णी (देशमुख)** | |
| 161 | हैदराबाद संस्थानातील वंदे मातरम् चळवळीत मराठवाडयातील विद्यार्थ्यांचा सहभाग | प्रा.डॉ. पी.आर.जुनघरे | |
| 162 | औरंगाबाद जिल्ह्याचा समृद्ध ऐतिहासिक वारसा | डॉ.वनिता साबळे-चव्हाण<br>प्रा. किर्ती विकास वर्मा | |
| 163 | मराठवाड्यातील संत साहित्य | मानसी सचिन सरदेशपांडे | |
| 164 | "मराठवाडयातील स्त्री जिवन आणि सद्यःस्थिती" | डॉ. कांबळे एम.एस. | |
| 165 | मराठवाड्यातील नामांतर आंदोलन : एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. डॉ. सुनीता आत्माराम टेंगसे<br>गांगर्डे गोपाळ मदन | |
| 166 | **भारतातील पर्यटनाची स्थिती** | **प्रा.कदम रिता** | |
| 167 | मराठवाड्याच्या विकासातील आव्हाने | प्रा. डॉ. राजु वनारसे<br>डॉ. सत्यपाल कांबळे | |
| 168 | औरंगाबाद जिल्हयातील पर्यटन अभ्यास विशेष संदर्भ अजिंठा लेणी | प्रा.डॉ.कालिदास दिनकर फड | |
| 169 | बीबी का मकबरा एक ऐतिहासिक पर्यटन स्थळ | **प्रा. घाडगे मिलिंद व्यंकटी** | |
| 170 | नामांतर चळवळ | प्रा. रघुनाथ व्यंकटी घाडगे | |
| 171 | **शैलगृह वास्तुशिल्पकला : वेरूळचे कैलास मंदिर** | **प्रा. सोमनाथ व्यंकटी घाडगे** | |
| 172 | मराठवाड्याचा पाणी प्रश्न आणि जायकवाडी धरण | सत्यजीत श्रीनिवास मस्के<br>डॉ.उमाकांत राठोड | |
| 173 | **निजामशाहीतील शाह ताहीरचे शैक्षणिक कार्य** | **प्रा. डॉ. सय्यद मुजीब मुसा** | |
| 174 | **मराठवाड्यातील शिल्पवैभव एक अभ्यास** | **डॉ. अंजली डी. काळे** | |



Scanned by TapScanner

**OUR HERITAGE**
*ISSN : 0474-9030 Vol-68, Special Issue-11*
Impact Factor (2020) - 6.8

# हैदराबाद संस्थानातील वंदे मातरम् चळवळीत मराठवाडयातील विद्यार्थ्यांचा सहभाग

प्रा.डॉ. पी.आर.जुनघरे
(इतिहास विभाग प्रमुख )
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान
महाविद्यालय मेहकर जि बुलडाणा
मो.न.9822530171
चंतउमीूतरनदहींतम07 / हउंपसण्बवउ

**प्रस्तावना :–**

इ.स.1938 हे वर्षे संपुर्ण हैदरबाद संस्थानाच्या आयुष्यात अत्यंत महत्वाचे व प्रतिकाराचे वर्ष ठरले. हैदरबाद स्टेट कॉंग्रेसचा सत्याग्रह सुरू होण्यापुर्वी हैदराबाद संस्थानातील संपुर्ण विद्यार्थी विश्व अस्वस्थ होते सरकारकडून उत्तरोत्तर अन्याय वाढत होते. त्याच बरोबर विद्यार्थ्यांची सहनशक्ती सुध्दा वाढत होती. देशातील अन्य प्रदेशातील आंदोलनामध्ये विद्यार्थी वर्ग मोठया प्रमाणावर सहभागी होत होता. त्याप्रमाणे हैदराबाद संस्थानातील स्टेट कॉंग्रेसच्या सत्याग्रहाला विद्यार्थी वर्गातुन जोरदार पाठींबा मिळत होता. हैदराबाद संस्थानात त्यावेळी उस्मानिया विद्यापीठ एकमेव विद्यापीठ होते. त्या अंतर्गत तेलंगणा, मराठवाडा अणि कर्नाटक या तीन भाषिक विभागात वरंगल,औरंगाबाद, गुलबर्गा ठिकाणी इंटरमिजिएट कॉलेज होती. प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी एक सरकारी हायस्कूल असून त्याला उर्दुमध्ये मदरसे फौकनिया असे म्हणत. उस्मानिया विद्यापीठातील आणि हायस्कूल मधील सर्व शिक्षण उर्दु माध्यमातुन दिले जात होते. निजाम सरकारकडून भेदभावाच्या धोरणाचा अवलंब केला जात होता. म्हणून विद्यार्थीवर्गात असंतोष निर्माण झाला. हया असंतोषाची पहिली ठिणगी मराठवाडयातील औरंगाबाद येथे पडली. आणि त्यामधुन वंदे मातरम् विद्यार्थी आंदोलनाला प्रारंभ झाला. प्रस्तृत शोधनिबंधामध्ये त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**1) औरंगाबादच्या इंटरमिजिएट कॉलेजचे वसतीगृहः**

औरंगाबाद शहरात त्यावेळी एक हायस्कूल आणि एक इंटरमिजिएट कॉलेज होते. या कॉलेजचे वसतीगृह सध्याच्या सुभेदारी गेस्ट हाऊस जवळ किलेअर्क परिसरात होते. तेथील मुसलमान विद्यार्थी दररोज नमाज पढीत असत. त्यामुळे हिंदु विद्यार्थ्यांनी सुध्दा वंदेमात्रम हे गीत प्रार्थना म्हणून सुरू केली. अर्थात या पाठीमागे एक पार्श्वभुमी होती. औरंगाबाद येथील इंटरमिजिएट कॉलेजमध्ये गोविंदभाई श्रॉफ प्राध्यापक म्हणून विद्यार्थीवर्गात लोकप्रिय होते. त्यांनी विद्यार्थ्यांना देशभक्तीचे धडे देउन योग्य संस्कार केले. अध्यापनाचे कार्य करीत असतांना विद्यार्थ्यांमध्ये राजकीय जागृती निर्माण केली. त्यामुळे सळसळत्या रक्ताचे, चळवळया स्वभावाचे, बंडखोर निष्ठावान व संवेदनशिल तरूणांचा गट त्यांच्याभवती गोळा होत असे. गोविंदभाई यांनी महात्मा गांधीजींच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला होता. 1937 मध्ये परतुर या ठिकाणी पार पडलेल्या महाराष्ट्र परिषदेच्या आधिवेशनात त्यांचा सक्रिय सहभाग होता. त्यामुळे निजाम सरकारची त्यांच्यावर करडी नजर होती. गोविंदभाईच्या सरकारविरोधी कारवाया लक्षात घेउन सरकारने 9 नोंव्हेबर 1938 रोजी नोकरीतुन काढले. गोविंदभाईना कॉलेजमधून काढून टाकल्याची बातमी विद्यार्थ्यांना दुसऱ्या दिवशी माहिती झाली. त्यामुळे विद्यार्थ्या वर्गात असंतोष निर्माण झाला.

**2) वंदे मातरम् विद्यार्थी आंदोलनाला सुरूवातः**

गोविंदभाई श्रॉफ यांना औरंगाबादच्या इंटरमिजिएट कॉलेजमधुन काढून टाकल्याची बातमी विद्यार्थ्यांना माहिती झाल्यानंतर त्यांच्यात असंतोष निर्माण होउन त्याचे पडसाद कॉलेजमध्ये पडण्याला सुरूवात झाली. दिनांक 14 नोंव्हेबर 1938 पासून विद्यार्थ्यांनी वंदे मात्रम हे गीत प्रार्थना गीत म्हणून गायला सुरूवात केली. त्यावेळी सय्यद मोहयोद्दीन कॉलेजचे प्राचार्य होते.त्यांनी इंटरमिजिएट कॉलेजच्या वसतीगृहात जावून विद्यार्थ्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु विद्यार्थी ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. त्यांनी दुसऱ्या दिवसा पासून अन्नत्याग सत्याग्रह सुरू केला. शेवटी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी



Scanned by TapScanner

उस्मानिया विद्यापीठाचे कुलगुरू व शिक्षणमंत्री नबाब मेहंदी नवाज जंग यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी वसतीगृहामध्ये विद्यार्थ्यांना वंदेमात्‌रम गाता येणार नाही. तसेच अन्नत्याग सत्याग्रह सुध्दा करता येणार नाही असे प्राचार्यांना तारेद्वारे कळविले. दरम्यानच्या काळात विद्यार्थ्यांनी गोविंदभाई श्रॉफ याचे मार्गदर्शन घेतले. तेव्हा आपल्या न्यायहक्कासाठी लढा व शासनाचे म्हणने ऐकु नका असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पुन्हा अन्नत्याग सत्यग्रह सुरू केला.

3) वंदे मातरम्  सार्वत्रिक बंदीः

हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठातील मुलांची वसतीगृहे ए.बी.सी. या नावाने ओळखली जात होती. या वसतीगृहाला लागुन हिंदु आणि मुसलमान विद्यार्थ्यासाठी वेगवेगळी प्रार्थनागृहे होती. हिंदु मुले आपल्या प्रार्थनास्थळात जाउन वंदे मातरम्  हे गीत सामुहिकपणे गात असत. औरंगाबादची घटना घडेपर्यंत याकडे कोणाचे लक्ष नव्हते. परंतु याचकाळात कोणीतरी कुलगुरू आणि शिक्षणमंत्र्याकडे तकार केली. हिंदु मुले जे गीत गातात ते धार्मिक नसुन राजकीय आहे.तसेच हया गीतामुळे मुस्लीमांच्या धार्मिक भावना दुःखावल्या जातात. अशा स्वरूपाची तकार शिक्षणमंत्र्याकडे करण्यात आली. याचवेळी औरंगाबादच्या इंटरमिजिएट कॉलेजचे प्राचार्य हैदराबादला आलेले होते. त्यांनी उस्मानिया विद्यापीठाचे कुलगुरू काझी महमंद हुसेन व शिक्षणमंत्री मेहंदी यार जंग यांची भेट घेतली. या प्रश्नावर विचार करण्यासाठी शिक्षणमंत्र्यांनी 18 नोंव्हेबर रोजी तातडीची बैठक बोलाविली. आणि या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार विद्यापीठाच्या आवारात वंदे मातरम् गीतावर बंदी घातली तशा स्वरूपाचा सरकारी आदेश काढण्यात आला. दरम्यानच्या काळात रमजान सण सुरू असल्यामुळे शाळा महाविद्यालये बंद होती. परंतु 28 नोंव्हेबर 1938 रोजी ती सुरू झाली त्यावेळी वंदे मातरम् वर सार्वत्रिक बंदी घातल्याचे विद्यार्थ्यांच्या लक्षात आले.

4) वंदे मातरम् वरील सार्वत्रिक बंदीचे पडसादः

हैदराबाद सरकारने तातडीची बैठक घेउन वंदे मातरम्  गीत गाण्यावर बंदी घातली ही बातमी विद्यार्थ्यांना माहिती झाल्यानंतर त्यांच्यामध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला. हैदराबाद शहरासंह संपुर्ण संस्थानामधील विद्यार्थ्यांनी प्रतिकार करण्याचा निर्णय घेतला. दिनांक 30 नोंव्हेबर पासून हैदराबाद शहरातील विद्यार्थ्या संपावर गेले. हळुहळु गुलबर्गा, वरंगल, औरंगाबाद येथील इंटरमिजिएट कॉलेज आणि परभणी, नांदेड, बिदर, महेबुब नगर व औरंगाबाद येथील हायस्कूलमधील विद्यार्थीसुध्दा संपात सहभागी झाले. थोडक्यात औरंगाबाद शहरातील वसतीगृहात सुरू झालेल्या वंदेमात्‌रम चळवळीचे लोण संपूर्ण हैदराबाद संस्थानामध्ये पसरले. हैदराबाद सरकारने आदेश काढून विद्यार्थ्यांनी वंदेमात्‌रम म्हणू नये, संप थांबवावा व वर्गात हजर व्हावे असे सांगीतले. तसेच जे विद्यार्थी संपावर गेले त्यांना शाळेतून काढून टाकण्यात आले. आतापर्यंत औरंगाबाद पर्यत मर्यादित असलेले हे प्रकरण संपूर्ण हैदराबाद राज्यात जावून पोहचले . सरकारच्या भेदभावाच्या धोरणामुळे अगोदरच विद्यार्थ्या वर्गात असंतोष होता. उस्मानिया विद्यापीठात शिक्षणाचे माध्यम उर्दु, मातृभाषेला दुय्यम स्थान, विद्यापीठात इस्लाम धर्मशास्त्राचे शिक्षण, अरबी,फारसी,उर्दु विषयाचे खास विभाग, इस्लामधर्माचे शिक्षण देणारा दीनियात या नावाचा आवश्यक विषय, नितीशास्त्रामध्ये इस्लामधर्मातील पुराणकथा, साधी राहणी व उच्च विचार सरणी याचे उदाहरण म्हणून हैदराबादचा निजाम मिर उस्मान अलीच्या नावाचा उल्लेख, भोजनगृहात शेरवाणी व पायजमा परिधान करून येण्याचा आग्रह इत्यादी कारणामुळे विद्यार्थ्या वर्गात अगोदरपासूनच असंतोष धुमसत होता. वंदे मातरम् वरील सार्वत्रिक बंदीमुळे या असंतोषाची आग संपूर्ण संस्थानात भडकत गेली.

5) हैदराबाद सरकारची प्रतिकियाः

वंदे मातरम् चळवळीच्या निमित्ताने सरकारविरोधी असंतोषाच्या भडका संपूर्ण हैदराबाद राज्यात पसरला. उस्मानिया विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी आपण वंदे मातरम् गीत गाणार अशा स्वरूपाचे लेखी निवेदन विद्यापीठाच्या कुलगुरूना दिले. त्यावर कुलगुरूनी शिस्तभंग व सरकारी आदेश मोडल्याचा आरोप ठेवून 110 विद्यार्थ्यांची विद्यापीठाच्या वसतीगृहामधून हकालपटटी केली. तसेच त्यांना वर्गात बसण्यास मनाई केली. हळूहळू 30 नोंव्हेबर ते 6 डिसेंबर पर्यत जवळपास सहाशे विद्यार्थ्यांची नावे हजेरीपटावरून कमी करण्यात आली. 10डिसेंबरला निजाम सरकारच्या माहितीखात्याने पत्रक काढून वंदे मातरम् हे गीत



Scanned by TapScanner

'हिंदू प्रार्थनेचा एक भाग असले तरी तो वादग्रस्त विषय झालेला असल्यामुळे विद्यार्थ्यांचे म्हणने मान्य करता येणार नाही.' त्याचबरोबर त्यानंतर संस्थानामधील शाळा महाविद्यालयांनी जवळपास बाराशे विद्यार्थ्यांना काढून टाकल्याचे जाहिर केले. तसेच दरम्यानच्या काळात उस्मानिया विद्यापीठाच्या कुलगुरूनी काही विद्यार्थीप्रिय प्राध्यापकांच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांची बाजू घेउन आम्ही त्यांना वंदे मातरम् पासून परावृत्त करणार नाही. असे ठामपणे सांगीतले त्यामुळे पडलेली गाठ आधिकच पक्की झाली. संपुर्ण डिसेंबर महिना संपामध्येच गेला. मुले शाळा माहाविद्यालयात जात नव्हती. बाहेर हैदराबाद स्टेट कॉंग्रेसचा सत्याग्रह सुरू होता. त्यामध्ये विद्यार्थ्यावर्गाचा सहभाग आधिक असल्यामुळे वंदे मातरम् चळवळ कॉंग्रेसप्रणित राजकीय चळवळ असल्याचे सरकारचे मत बनले.

**6) वंदे मातरम् चळवळीत सहभागी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्नः**

वंदे मातरम् आंदोलनामध्ये सहभागी झालेल्या अनेक विद्यार्थ्यांना कॉलेज मधून काढून टाकण्यात आले. त्यामध्ये मराठवाडयातील विद्यार्थ्यांची संख्या लक्षनिय स्वरूपाची होती. त्यामध्ये भास्कर देवीदास बोराळकर, गोविंद बापूराव देशमुख चंद्रकांत अंबादास वैद्य, सखाराम पंढरीनाथ, अच्युत खोडवे, नाथराव कापसे, दत्तात्रय जोशी, डिंगाबर शाहणे, बाबुराव मुळे, दुर्गादास देशपांडे, विश्वनाथ बसोले, मनोहर पुजारी अशा अनेक विद्यार्थ्यांचा समावेश होतो. हया सर्व विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडु नये त्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये असा प्रश्न मराठवाडयातील आंदोलनामधील नेत्यासमोर निर्माण झाला मवाळ विचाराचे नेते हा प्रश्न तडजोडीच्या मार्गाने सुटावा या मताचे होते. तर तरूण जहाल नेते आनंद कृष्ण वाघमारे, गोविंदभाई श्रॉफ, स.कृ. वैशपायन यांच्या मते विद्यार्थ्यांनी शिक्षणाची परवा न करता सरळ सरकार विरोधी आंदोलनामध्ये उडी घेउन पारतंत्र्याला कारणीभूत ठरणारे, अन्याय अत्याचार करणारे, निजामाचे राज्य उलथून टाकावे असी भूमिका त्यांनी घेतली. औरंगाबादचे गोविंदभाई श्रॉफ विद्यार्थ्यांच्या पाठीमागे ठामपणे उभे राहिले.

**7) नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरूंचा ऐतिहासिक निर्णयः**

वंदे मातरम् आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून त्या संदर्भात विचार विनिमय करण्यासाठी हैदराबात येथे कृतिसमिती स्थापन करण्यात आली. त्यामध्ये रामचंद्रराव अंतू, लक्ष्मणराव गाणू व गोविंदभाई श्रॉफ यांचा समावेश होता. हैदराबाद येथील काही पुढा. यांच्या मते बनारस हिंदू विद्यापीठाच्या प्रमाणे संस्थानाबाहेर एक स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करावे. तसेच तोपर्यत बाहेर कुठे या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो काय ? या विषयी प्रयत्न करण्यात आले. परंतु अन्नामलाई, बनारस व मद्रास येथील विद्यापीठानी या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास मनाई केली. परंतु मेहकरचे रहिवाशी असलेल्या वि.घ.देशपांडे या हिंदु महासभेच्या नेत्यामार्फत कृतिसमितीच्या नेत्यांनी नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू तुकारामपंत केदार यांची भेट घेतली. नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू स्वःत राष्ट्रीय चळवळीशी बांधीलकी ठेवून असल्यामुळे त्यांनी खुल्या मानने आपल्या विद्यापीठात या विद्यार्थ्यांचे स्वागत केले. मद्रास विद्यापीठांचे कुलगुरू आतंरविद्यापीठीय मंडळाचे अध्यक्ष होते. त्यांनी उस्मानिया विद्यापीठाची परवानगी घ्यावी असा सल्ला दिला. परंतु नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरूनी नियमांच्या भानगडीत न पडता जानेवारी 1939 मध्ये वंदे मातरम् चळवळीत सहभागी झालेल्या सर्वच विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा निर्णय घेतला त्यामुळे सुमारे बाराशे विद्यार्थी गटागटाने नागपूरकडे रवाना झाले. त्यामध्ये भारताचे माजी पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव यांचा समावेश होता. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा प्रश्न नागपूर विद्यापीठाने नागप्र व जबलपुर येथे प्रवेश देवून सोडविला. परंतु मराठवाडयातील हायस्कूलचे विद्यार्थी सुध्दा मोठया प्रमाणावर वंदे मातरम् चळवळीमध्ये सहभागी झाले होते. त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न सुध्दा होता. त्यामध्ये दहावीत शिकणा.या विद्यार्थ्यांची व्यवस्था खामगांवच्या राष्ट्रीय विद्यालयामध्ये करण्यात आली. तर नववीचे विद्यार्थी अहमदनगरला पाठविण्यात आले. आठवीचे विद्यार्थी येवल्याच्या आपटे गुरूजी विनय मंदिरात दाखल करण्यात आले.

**8) वंदे मातरम् विद्यार्थी आंदोलनाला राष्ट्रीय नेत्यांचा पाठींबाः**

हैदराबाद संस्थानामधील विद्यार्थ्यांनी वंदे मातरम् म्हणण्याचा हक्क प्राप्त करण्यासाठी संप, हरताळ या मार्गाचा अवलंब केला .त्यामुळे त्यांना हैदराबाद राज्यातून बाहेर पडावे लागले. नागपूर विद्यापीठात या



Scanned by TapScanner

**OUR HERITAGE**
*ISSN : 0474-9030 Vol-68, Special Issue-11*
Impact Factor (2020) - 6.8

विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. हे सर्व विद्यार्थी नागपूर व जबलपूर या ठिकाणी शिक्षणासाठी असतांना मध्यप्रदेशातील त्रिपुरी याठिकाणी कॉंग्रेसचे अधिवेशन भरले. या अधिवेशानात 11 मार्च 1939 रोजी वंदे मातरम् विद्यार्थ्यांचा मेळावा झाला. त्यामध्ये विद्यार्थी नेत्यांची भाषणे झाली. पंडित नेहरूनी सुध्दा भाषण करून विद्यार्थ्यांच्या हया आंदोलनाला पाठींबा दिला. सुभाषबाबूनी तर अगोदरच कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांनी सरकारला शरण जाउ नये असा सल्ला दिला होता. स्वातंत्र्यवीर सावरकारांनी सुध्दा वंदे मातरम् चळवळीचे समर्थन करून विद्यार्थ्यांना लढण्यासाठी उत्तेजन दिले. महात्मा गांधी यांनी हैदराबाद संस्थानचे प्रधानमंत्री अकबर हैदरी यांना पत्राद्वारे 'विद्यार्थ्यांना वंदे मातरम् म्हणण्याचा पुर्ण अधिकार आहे. ' असे सांगून विद्यार्थ्यांची पाठराखण केली. या सर्व राष्ट्रीय स्तरावरच्या नेत्यांनी वंदे मातरम् चळवळीचे समर्थन केल्यामुळे विद्यार्थ्यामध्ये उत्साह निर्माण झाला.

सारांशः

वंदे मातरम् आंदोलनामध्ये सहभागी झाल्यामुळे मराठवाडयातील विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी खामगांव जबलपूर व नागपूर याठिकाणी जावे लागले त्यामध्ये त्यांचे खुप हाल झाले. अनेकांना अर्धपोटी आणि उपाशी दिवस कंठावे लागले. परंतु वंदे मातरम्च्या निमित्ताने त्यांनी स्वातंत्र्याचे ध्येय स्वीकारले होते. त्यासाठी त्याग करण्याची उर्मी त्यांच्या मनात ठासून भरली होती म्हणून त्यांनी कठीण दिवस सुध्दा हसून खेळून काढले. राष्ट्रीयस्तरावरच्या नेत्यांनी शाबासकीची थाप पाठीवर मारल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला. त्यानंतर 1938 ते 1948 पर्यंत हैदराबाद संस्थानात जेवढी आंदोलने झाली. त्यामध्ये वंदे मातरम् चळवळीत सहभागी झालेले विद्यार्थी आघाडीवर होते. त्यांनी त्यानंतर प्रत्येक गावात जावून मोठया प्रमाणावर जनजागृती केली. प्रस्तुत जनजागृती हैदराबादचा निजाम मीर उस्मान अली जो चंद्र सुर्य असेपर्यंत हैदराबाद संस्थानवर राज्य करण्याचे स्वप्न पाहत होता त्यासाठी धोक्याची घंटा ठरली. त्यामुळे वंदे मातरम् विद्यार्थी चळवळीला हैदराबादच्या स्वातंत्र्य संग्रामामध्ये अनन्यसाधारण असे महत्व आहे.

संदर्भग्रंथः

1. भालेराव, अनंत, हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, मौज प्रकाशनगृह, मुंबई, डिसेंबर 2012
2. फडके, य.दि.,20 व्या शतकातील महाराष्ट्र खंड 4 था, श्री विद्यापकाशन पुणे, जुन 1993
3. रोडे, डॉ.सोमनाथ, मराठवाडयाचा इतिहास, विद्या बुक पब्लीशर्स, औरंगाबाद, जुन 2011
4. कुलकर्णी, व्हि.टी. , हैदराबादच्या आठवणी, किर्ती प्रकाशन, औरंगाबाद, सप्टेंबर 1998

330

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar,Dist.Buldana



Scanned by TapScanner